महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २८ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# भिवंडी शहराच्या सर्वांगीण विकासाला मिळणार गती

## ठाणे- भिवंडी-कल्याण भूमीगत मेट्रोसह नवीन उड्डाणपूल निर्मितीचा स्वतंत्र प्रकल्प राबवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २७ :** भिवंडी शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या परिवहन सेवेच्या गरजा भागविण्यासाठी कल्याण - भिवंडी मेट्रो लाईन प्रकल्प राबविण्यात येत आहे. भिवंडी शहरात वाढती लोकसंख्या, मालवाहतूकदारांची मोठी संख्या यामुळे कायमच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे येथील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा निघण्याकरीता आणि शहराच्या सर्वांगीण, वेगवान पायाभूत विकासासाठी भूमीगत मेट्रोसह रस्ता रुंदीकरण व नवीन उड्डाणपूल निर्मितीचा स्वतंत्र प्रकल्प राबविण्याचा निर्णय ठाणे-कल्याण-भिवंडी मेट्रो मार्ग क्रमांक ५ च्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला.




पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांमुळे भिवंडी शहराच्या विकासाला गती मिळणार असून या प्रकल्पांसाठी शासन निधी उपलब्ध करून देईल. भिवंडी शहरात मेट्रोच्या कामासोबतच रस्ता रुंदीकरण प्रकल्पाचे कामही सुरू करण्यात यावे. भिवंडी शहरातील नागरिकांची या प्रकल्पांच्या पूर्णत्वानंतर वाहतूक कोंडीच्या समस्येतून कायमस्वरूपी सुटका होणार आहे, भिवंडीवासियांसाठी मेट्रो प्रमाणेच रस्ता रुंदीकरण प्रकल्पही महत्वाचा आहे. त्यामुळे दोन्ही प्रकल्पांचे काम सोबतच सुरू करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. रस्ता रुंदीकरण प्रकल्प राबविल्यामुळे भिवंडी शहरातील उत्तर भागाचा सर्वांगीण विकास होणार असून या भागातील नागरिकांचे दळण वळण गतीमान होण्यास निश्चितच मदत होणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (MMRDA) राबविण्यात येत असलेल्या मेट्रो लाईन-५ या प्रकल्पांच्या माध्यमातून ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर परिसरातील लाखो नागरिकांना जलद, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होणार आहे. विकसनशील शहरे आणि औद्योगिक केंद्रे यांच्यासाठी सार्वजनिक वाहतूक व रस्ते ही दोन्ही माध्यमे परस्परपूरक असून त्यांची अंमलबजावणी समांतर पद्धतीने केल्यास विकासाची गती वाढेल. नागरिकांना अधिक फायदेशीर सेवा मिळू शकणार आहे.

या प्रकल्पांमुळे भिवंडी शहरातील दळणावळणाला गती येणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, या भागातील औद्योगिक विकासालाही चालना मिळणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा विस्तार आता कल्याणच्या पुढे उल्हासनगरपर्यंत होत आहे. उल्हासनगरच्यापुढे अंबरनाथ जवळील चिखलोली उपनगरीय रेल्वे स्थानकापर्यंत विस्तार करण्याबाबत अभ्यास करण्यात येत आहे. यामुळे अंबरनाथ, उल्हासनगर, शहाड आणि आजूबाजूच्या परिसरातील लाखो रहिवाशांना मुंबई आणि ठाणे या प्रमुख शहरी केंद्रांपर्यंतचा प्रवास अधिक जलद होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये भिवंडी हे मालवाहतूकीचे विकासकेंद्र होत आहे. या शहराच्या विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. शहरातील पायाभूत सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. शहरातील मेट्रो मार्गाच्या कामाबाबत आलेल्या लोकप्रतिनिधींच्या सूचनांचाही अंतर्भाव करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिल्या. मेट्रोचे काम करताना 'डिप टनेल' तंत्रज्ञान वापरून बोगदा तयार करण्याच्या कामाची पडताळणी करावी. तसेच दुहेरी बोगदा तंत्रज्ञान वापरून रस्ता व मेट्रो मार्ग तयार करण्याच्या कामाचाही अभ्यास करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

### ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्ग क्रमांक ५ ठळक वैशिष्ट्ये

* लांबी: एकूण 34.23 किमी.
* यात मेट्रो मार्ग -५ टप्पा १ (11.90 किमी), मेट्रो मार्ग -५ टप्पा २ (10.5 किमी) आणि मेट्रो मार्ग -५अ (11.83 किमी) यांचा समावेश आहे.
* स्थानके : १९ स्थानके ( १ भूमिगत व उर्वरित उन्नत)
* ट्रेनची रचना : 6 डब्यांची ट्रेन.
* प्रस्तावित डेपो : काशेळी येथे (26.93 हेक्टर).
* इंटरचेंज स्थानके: कल्याण स्थानक (मेट्रो मार्ग 12 सह) आणि कापूरबावडी (मेट्रो मार्ग 4 ).
* प्रकल्पाची अंदाजित किंमत:
* मेट्रो मार्ग ५ : ८४१७ कोटी व मेट्रो मार्ग ५ अ: ४०६३ कोटी




## निवडणुका लढविण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे - उद्योग मंत्री उदय सामंत



## भिवंडीत शिवसैनिकांचा संवाद मेळावा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

❍ शरद भसाळे

**भिवंडी :** आगामी महाराष्ट्रात होणाऱ्या नगरपालिका, महानगर पालिका,पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीत शिवसेनेला भरघोस यश मिळवून भगवा फडविण्याचे लक्ष पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठेवले आहे.त्यामुळे शिवसैनिकांनी आपले मतभेद विसरून एकदिलाने सज्ज होऊन कामाला सुरुवात करावी असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी भिवंडीत आयोजित केलेल्या पदाधिकारी व कार्यकर्ते मेळाव्यात केले आहे.

येणाऱ्या काळात राज्यात नगरपालिका,महानगर पालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषद पंचायत समितीचे सार्वत्रिक निवडणुका होणार आहे त्यामुळे ठाणे जिल्ह्यात शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाच्या वतीने मोर्चा बांधणी सुरू झाली आहे.आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका मध्ये भरघोस यश मिळवण्यासाठी व पदाधिकारी कार्यकर्त्यांशी संवाद साधून त्यांच्यामध्ये चैतन्य भरण्यासाठी भिवंडी लोकसभा कार्यक्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्ते साठी मार्गदर्शन मेळावा शिबीर भिवंडी तालुक्यातील वडपा गावाजवळील रिसॉर्ट मध्ये काल सायंकाळी आयोजित करण्यात आले होते.प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावले,शिवसेना उपनेते प्रकाश पाटील,रूपेश म्हात्रे,शिवसेना ठाणे ग्रामीण जिल्हा प्रमुख देवानंद थळे,भिवंडी पश्चिम शहर प्रमुख शाम पाटील यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लक्षात घेऊन ठाणे शहर व ग्रामीण जिल्ह्यावर शिवसेनेने लक्ष केंद्रित केले आहे.

त्यामुळे कार्यकर्तेनी पक्ष मजबूत करून कामाला लागावे अशी सुचना यावेळी मंत्री सामंत यांनी यावेळी केली.ठाणे ग्रामीणचे जिल्हाप्रमुख देवानंद थळे, शिवसेना उपनेते प्रकाश पाटील यांच्यावर पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे यांनी शिवसंपर्क संवाद मोहीम व आगामी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांची व्युहरचना करून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मध्ये संवाद साधण्याची जबाबदारी दिली आहे.त्यानुसार ठाणे ग्रामीण क्षेत्रात शिवसेनेने जोरदार पक्ष बांधणी सुरू केली असून ग्रामीण जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी संपर्क मोहिमेद्वारे शिवसैनिकांशी संवाद व मतदारसंघातील मतदारांशी संपर्क साधण्याचे कामकाज सुरू केले आहे.याचाच एक भाग म्हणून हा संवाद मेळावा घेतल्याची माहिती यावेळी देण्यात आली.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुध्दा मार्गदर्शनपर भाषण करून आपली मनोगत व्यक्त केली. या शिबीर मेळाव्यास मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## गावनिहाय सरपंच पदासाठी पुन्हा आरक्षण ?
# प्रस्थापित इच्छूकांचा हिरमोड !

**स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुक घ्या, असा आदेश न्यायालयाने सरकारला दिला आहे. येत्या डिसेंबर, जानेवारी महिन्यात या निवडणुका होतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. अशातच राज्यातील सुमारे 17 हजारपेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी इच्छुकांचा संभ्रम वाढला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गावनिहाय सरपंच पदासाठीचे आरक्षण पुन्हा निश्चित करण्याच्या शासनाच्या निर्णयाने प्रस्थापित इच्छुक हिरमुसले आहेत. मध्यंतरी काढलेल्या आरक्षण सोडतीत अनेक ठिकाणी खुला प्रवर्ग पडले होते. यामुळे अनेकजण त्या दृष्टीने कामाससुद्धा लागले होते. मात्र आता पुन्हा आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

शासनाने मध्यंतरी सोडत काढून सरपंच पद आरक्षण निश्चित केले होते. त्याचवेळी ग्रामविकास विभागाने 2030 पर्यंत कार्यकाल संपणाऱ्या सरपंच पदाचा राज्याचा कोटा निश्चित केला. खुल्या प्रवर्गासाठी 13 हजार 67, ओबीसी 6 हजार 729, एससी 3 हजार 262, तर एसटीची 1 हजार 866 सरपंच पदे आहेत. त्यापैकी महिलांसाठी 12,496 पदे राखीव आहेत. तसेच लवकरच तालुकानिहाय सरपंच पदाचा कोटा निश्चित करून तो जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना कळविण्यात येणार आहे. तहसीलदारांकडून त्या तालुक्यातील सरपंच पदासाठी दहा दिवसात आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींचे आरक्षण मान्य केल्याने राज्यात ओबीसी सरपंच पदे वाढणार आहेत. ग्रामविकास विभागाने मार्च 2025 मध्ये अधिसूचना काढून 26.04 टक्के यानुसार इतर मागास प्रवर्गाचे (ओबीसी) सरपंच पदाचे कमी आरक्षण जिल्ह्यांना दिले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इतर मागास प्रवर्गाचे (ओबीसी) 27 टक्के आरक्षण मान्य केले. त्यामुळे ग्रामविकास विभागाने दिलेले पूर्वीचे सरपंच आरक्षण रद्द झाले आहे. आता ओबीसींच्या सरपंच पदाच्या वाढीव कोट्यासह पुन्हा आरक्षण सोडत काढण्याचे निर्देश आहेत. या नव्या बदलानुसार राज्यात खुल्या प्रवर्गात गेलेली ओबीसी सरपंच पदे ही पुन्हा ओबीसी प्रवर्गात येणार आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यात नव्याने सरपंच पदाची आरक्षण सोडत काढावी लागणार आहे.



## अंबरनाथ मधील चिखलोली धरण जून महिन्यातच 'ओव्हर फ्लो'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. २७ :** अंबरनाथ शहराच्या पूर्व भागाला पाणीपुरवठा करणारे चिखलोली धरण यावर्षी जून महिन्यातच भरून वाहू लागले आहे. यंदा मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस, त्यानंतर संततधार पडलेल्या पावसामुळे धरणाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली आहे. जून महिन्याच्या अखेरीला धरण ओसंडून वाहू लागल्याने जलसाठ्याच्या दृष्टीने दिलासादायक बाब मानली जात आहे. त्यामुळे आगामी काळात शहरातील पाणीपुरवठा सुरळीत राहण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. धरण परिसरात सध्या निसर्गरम्य वातावरण पाहायला मिळत असून, वर्षा सहली आणि पर्यटनासाठी पर्यटकांची गर्दी चिखलोली धरणाकडे वाढू लागली आहे.




# व्यापारी शेतकरी सहकारी विकास पॅनलचे अधिकृत उमेदवार

**नमस्कार, मी सर्वांचा आपला काशिनाथ (भाऊ) सहादू नरवडे व सदाशिव महादेव टाकळकर कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूकीसाठी (वर्षे २०२५ ते २०३०) आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. आपल्या सर्वांच्या आणि बाजार समितीच्या सार्वांगीण विकासासाठी आम्ही वचननामा सादर करत आहोत.**

## वचननामा

- येत्या सहा महिन्यात सुसज्ज अशा फुल मार्केटची निर्मिती करणार
- धान्य मार्केटमध्ये आकारण्यात येणारी शेअर्स फी कमी करणार.
- आर्थिक कामांसाठी महानगर को.ऑ. बँक बाजार समितीच्या आवारात स्थापन करणार.
- बाजार समितीमध्ये सुसज्ज असे सिमेंट क्राँक्रीटचे रस्ते बनवणार
- बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांना आणि ग्राहकांच्या सुरक्षततेसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन.
- बाजार समितीच्या आवारात पिण्यासाठी वापरण्यासाठी स्वच्छ पाण्याची सुविधा.
- व्यापाऱ्यांना व ग्राहकांना सोयीस्कर होण्यासाठी स्वतंत्र्य व स्वच्छ असे सर्व सोयींसह स्वच्छतागृह
- बाजार समितीच्या आवारात प्रत्येक रस्त्यावर पथदिवे बसविण्यात येतील जेणेकरून रात्री व्यापाऱ्यांना व शेतकऱ्यांना ग्राहकांना रात्री सुरक्षितता मिळेल.
- बाजार समितीच्या आजुबाजूने मोठी व सुरक्षित अशी संरक्षण भिंत बांधणार.
- बाजार समितीमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात इतर जिल्हा व राज्यांतील शेतकरी व व्यापारी येत असतात. त्यांना राहण्यासाठी स्वतंत्र्य असे सुसज्ज असे निवास स्थानाची निर्मिती.
- बकरी व जनावर मार्केटसाठी सुरक्षित व मजबूत असा सिमेंट क्राँक्रीटचा कोबा करण्यात येईल.



आपली निशाणी

छत्री

# भिंवडी लोकसभा मतदारसंघात विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न - खासदार सुरेश म्हात्रे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण** : भिवंडी लोकसभा मतदारसंघात मागील दहा वर्षात ज्या सत्ताधारी खासदारांना जमले नाही त्या विकास कामांसाठी मी एक वर्षाच्या काळात मी प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे मत भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी व्यक्त केले आहे.

लोकसभा सदस्य म्हणून शपथ घेतल्याला एक वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत खासदार सुरेश म्हात्रे यांनी आपली भूमिका मांडली. झालेल्या निवडणुकीत भिवंडीकरांना टोरंट संदर्भात दिलेल्या आश्वासनावर बोलताना मागील दहा वर्षात टोरंट पावरचा 'ट' ही कोणी उच्चारला नव्हता, पण मी त्यावर लोकसभा सभागृहात आवाज उठवला आहे. 2027 नंतर टोरंट बाबत सर्वांच्या साथीने योग्य निर्णय घेतला जाईल असे म्हात्रे यांनी म्हटले.

शहर व ग्रामीण च्या 15 लाख लोकसंख्येच्या आरोग्याची काळजी घेणारे स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा जिल्हा रुग्णालय करावा यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून राज्य आरोग्य विभागाकडून या बाबत सर्वेक्षण सुरू केले आहे तर भिवंडीकरांसाठी रेल्वे प्रवास जलद व्हावा यासाठी वसई दिवा रेल्वे मार्गावर भिवंडी ते दिवा दरम्यान रेल्वे सेवा वाढवावी तसेच लांब पल्ल्यांच्या या मार्गावरील गाड्यांना भिवंडी रोड रेल्वे स्थानकात थांबा द्यावा अशी मागणी रेल्वे मंत्र्यांकडे केली असून मुरबाड रेल्वे मार्गाचा तत्कालीन खासदारांनी पाठपुरावा केला नव्हता, तो आपण केल्यानंतर हे काम प्रगतीपथावर पुढे सरकले असे स्पष्ट केले.

शहापूरचा पाणी प्रश्न गंभीर आहे. भावली प्रकल्पाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव निधीस मंजुरी दिली.पण जलशुद्धीकरण प्रकल बनवला नाही. ठेकेदारांना पाईप लाइन टाकण्यात व श्रेय घेणाऱ्यांना ठेकेदाराची बिले मंजूर करून टक्केवारी घेण्यात स्वारस्य आहे. महसूल मंत्र्यांकडे जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव पडून होता. त्याचा पाठपुरावा केल्याने जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचा मार्ग सुकर झाला अून भिवंडी शहरातील वऱ्हाळ तलाव सुशोभीकरण कामासाठी केंद्राने 53 कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला पण 40 टक्के हिस्सा राज्य शासनाकडून मिळाव यासाठी राज्य सरकारकडे प्रयत्न सुरू आहेत.

त्याचबरोबर महामार्ग व राज्य मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या हा कळीचा मुद्दा आहे. त्याच्या सोडवणुकीसाठी शासन यंत्रणा व पोलिस प्रशासन यांच्या कडून योग्य ते सहकार्य मिळत नाही. पाच वेळा बैठका घेऊन सांगितलेल्या उपाययोजना प्रशासनाने न राबविल्यास जनतेच्या रोषाला यंत्रणेला सामोरे जावे लागणार आहे. भिवंडी- ठाणे बायपास रस्त्याचे आठ पदरी कॉंक्रीटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे.या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तपासणी होऊन त्याचा अहवाला सदर केला जाणार आहे. तर मुंबई- वडोदरा महामार्गावर भिवंडी वज्रेश्वरी दरम्यान महापे येथे वळण रस्ता दिल्यास त्याभागाचा विकास होऊन लाखो लोकांना रोजगार मिळू शकतो ही बाब केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी अहवाल तयार करून निधी मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत. स्टेम कडील विविध ग्रामपंचायत थकीत बिल व व्याज माफी संदर्भात 4 मार्च रोजी नियोजन भवन येथे बैठक घेऊन निर्णय झाला होता त्यानंतर काम होत आहे हे समजल्यावर 16 मार्चला माजी खासदारांनी पत्र देऊन याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला असा टोला माजी खासदार कपिल पाटील यांचे नाव न घेता लगावला. तर बुलेट ट्रेन प्रकल्पामध्ये जमीन विक्री व्यवहारात काही शे कोटी रुपयांचा भष्टाचार झाला आहे.याची तक्रार पोलिस आयुक्तांकडे केल्या नंतर त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेस चौकशीचे आदेश दिले आहेत. लोकसभा क्षेत्रात एक केंद्रीय विद्यालय स्थापन व्हावे यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला असून त्या बाबत लवकरच निर्णय होणार असल्याचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी स्पष्ट केले असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे.

# राज्यात हिंदी सक्ती धोरण उद्धव ठाकरेंनी स्वीकारले

## उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांचा गौप्यस्फोट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यात शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीचे धोरण महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना स्वीकारले होते. डॉ. माशेलकर समितीने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीने शिकवल्या पाहिजेत, असा प्रस्ताव ठाकरे यांनीच कॅबिनेटमध्ये स्वीकारला होता, मात्र आता हिंदी सक्ती नसताना देखील उबाठाकडून जाणीवपूर्वक हिंदी भाषेवरुन राजकारण केले जात आहे, अशी घणाघाती टीका उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी उबाठावर केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, हिंदीची सक्ती कुठेही करायची नाही आणि हिंदी अनिवार्य देखील करायची नाही ही शासनाची भूमिका आहे. मात्र महापालिका निवडणूक जवळ आल्याने काहीजण या मुद्द्याचे राजकारण करत आहेत, असा टोला मंत्री सामंत यांनी उबाठाला लगावला.

ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणी करण्यासाठी एक कार्यगट स्थापन केला होता. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या या समितीने इयत्ता पहिले ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा शिकवल्या गेल्या पाहिजेत, असा अहवाल सरकारला सादर केला होता. तो अहवाल २७ जानेवारी २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कॅबिनेटमध्ये स्वीकारला होता, असे मंत्री सामंत म्हणाले. राज्यात शैक्षणिक धोरण २०२० च्या धोरणानुसार बारावीपर्यंत हिंदी सक्तीबाबत उबाठाने हरकत का घेतली नाही, असा सवाल मंत्री सामंत यांनी यावेळी केली. ज्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात राज्यात हिंदी सक्ती लागू झाली तेच आता हिंदी भाषेबाबत मोर्चा काढत आहेत, ही दुटप्पी भूमिका असल्याची टीका मंत्री सामंत यांनी केली. महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्याने काहीजण भावनिक साद घालून मराठी आणि हिंदी भाषेवरुन राजकारण करत आहेत, अशी टीका मंत्री सामंत यांनी केली. विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेना काय करु शकते, हे उभ्या महाराष्ट्राने बघितले, असे ते म्हणाले.

मुंबईत मराठी भाषा केंद्र साकारले जाणार आहे. यासाठी १०० कोटी खर्च केले जाणार आहे, असे ते म्हणाले. मराठी भाषेचे उपकेंद्र ऐरोलीमध्ये होणार आहे. विश्व मराठी संमेलन, मराठी साहित्याच्याबाबत महिलांसाठी, युवकांसाठी साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन सरकारकडून केली जातात. मराठी ही मातृभाषा आणि ती प्रत्येकालाच आली पाहिजे, ही शासनाची भूमिका आहे, असे मंत्री सामंत म्हणाले.

मराठी साहित्यिकांची भूमिका समजून घेण्याबाबत त्यांच्याशी चर्चा करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिले आहेत, अशी माहिती मंत्री सामंत यांनी दिली. त्यानुसार पुढील आठवड्यात साहित्यिकांची बैठक घेणार आहे. राज ठाकरे यांच्या मोर्च्याविषयी भूमिका मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री घेतील, असे ते म्हणाले. मराठी भाषा मंत्री म्हणून वेळ पडल्यास राज ठाकरे यांची भेट घेऊ असे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

**आदित्य ठाकरेंकडून हिंदी भाषेची पाठराखण** : मराठी भाषेबरोबरच जेवढ्या जास्त भाषा येतील तेवढं चांगल असं मत उबाठा गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी एका पत्रकार परिषदेत व्यक्त केलं होतं. सिंगापूरमध्ये मातृभाषेबरोबरच इंग्रजी शिकवलं गेलं त्यामुळे त्यांची प्रगती झाली. देशात यूपीएसी ही सर्वात कठिण परिक्षा आहे, मात्र तिथून पास होणाऱ्या अधिकाऱ्यांना इंग्रजी, हिंदी आणि मातृभाषेमध्ये संवाद साधावा लागतो, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी एकप्रकारे हिंदी भाषेची पाठराखण केली होती.

### त्रिभाषिक नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रवास (NEP 2020)

- नोव्हेंबर २०१९ : उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदी निवड
- २०२० मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार
- ऑक्टोबर २०२० - त्रिभाषा सूत्र निश्चित करण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना
- २१ जानेवारी २०२१ : डॉ. माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाचा अहवाल सादर
- २७ जानेवारी २०२२ : डॉ. माशेलकर अहवाल कॅबिनेटमध्ये स्वीकारला या अहवालात इयत्ता पहिले ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषा शिकवण्याची कार्यगटाकडून शिफारस
- एप्रिल २०२५ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची महाराष्ट्रात अंमलबजावणी

### आदित्य ठाकरेंकडून हिंदी भाषेची पाठराखण

**मराठी भाषेबरोबरच जेवढ्या जास्त भाषा येतील तेवढं चांगल असं मत उबाठा गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी एका पत्रकार परिषदेत व्यक्त केलं होतं. सिंगापूरमध्ये मातृभाषेबरोबरच इंग्रजी शिकवलं गेलं त्यामुळे त्यांची प्रगती झाली. देशात यूपीएसी ही सर्वात कठिण परिक्षा आहे, मात्र तिथून पास होणाऱ्या अधिकाऱ्यांना इंग्रजी, हिंदी आणि मातृभाषेमध्ये संवाद साधावा लागतो, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी एकप्रकारे हिंदी भाषेची पाठराखण केली होती.**

## गीतासार



### अध्याय १४
### गुणत्रयविभागयोगः

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते । गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ॥ १४-२३ ॥

जो साक्षीरूप राहून गुणांकडून विचलित केला जाऊ शकत नाही आणि गुणच गुणांत वावरत आहेत, असे समजून जो सच्चिदानंदघन परमात्म्यात एकरूप होऊन राहतो व त्या स्थितीपासून कधी ढळत नाही ॥ १४-२३ ॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः । तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः ॥ १४-२४ ॥


जो पुरुष निरंतर आत्मभावात राहून दुःख-सुख समान मानतो, माती, दगड आणि सोने यांना सारखेच मानतो, ज्याला आवडती व नावडती गोष्ट सारखीच वाटते, जो ज्ञानी आहे आणि स्वतःची निंदा व स्तुती ज्याला समान वाटतात ॥ १४-२४ ॥

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः । सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ १४-२५ ॥

जो मान व अपमान सारखेच मानतो, ज्याची मित्र व शत्रू या दोघांविषयी समान वृत्ती असते, तसेच सर्व कार्यात ज्याला मी करणारा असा अभिमान नसतो, त्याला गुणातीत म्हणतात. ॥ १४-२५ ॥

## आरोग्य

### पावसाळा : मुलांची काळजी



पावसाळ्यात बहुतेक मुले शाळेतून परतताना ओली होतात, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. अशा परिस्थितीत कुटुंबातील सदस्यांना खूप त्रास सहन करावा लागतो, जेव्हा जेव्हा हवामान बदलते तेव्हा त्यांचे मूल आजारी पडते, असे का होते, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येतो. त्याची उत्तरे देखील प्रत्येकाच्या मनात येतात पण ते कसे रोखायचे हे जाणून घ्या.

**पाणी उकळवून प्या**

बदलत्या हवामानात मुलांना कधीही साधे पाणी पिण्यासाठी देऊ नये. त्यांना पाणी देण्यापूर्वी ते नेहमी उकळून घ्यावे. असे केल्याने, पाण्यात असलेले सर्व जंतू उकळून मारले जातात. यानंतर, तुम्ही पाणी गाळून मोठ्या भांड्यात ठेवू शकता. मुलांना भांड्यातून पाणी काढून ते पिण्यास सांगा.

**पाण्यात कडुलिंबाची पाने घाला आणि आंघोळ करा.**

जेव्हा जेव्हा मुले पावसात भिजून घरी येतात तेव्हा त्यांना सामान्य पाण्याऐवजी पाण्यात कडुलिंबाची पाने घालून आंघोळ घाला. यामुळे मुलांच्या शरीरात कोणतेही बॅक्टेरिया राहणार नाहीत. तसेच, पावसामुळे होणाऱ्या आजारांपासून आराम मिळेल.

**तेलाने मालिश करा**

जेव्हा जेव्हा मुले बाहेर खेळून किंवा शाळेतून परत येतात तेव्हा त्यांना थोडेसे कोमट तेलाने मालिश करावी. यामुळे त्यांच्या शरीरातील सर्व थकवा दूर होतो, ज्यामुळे त्यांना शरीरात कोणताही त्रास होत नाही. अशा प्रकारे ते दररोज ताजेतवाने शाळेत जाऊ शकतात.

# खोणी पलावा सोसायटीमधून अमली पदार्थ जप्त

## तीन आरोपींना अटक तर इतर आरोपींचा शोध सुरू

### हाय प्रोफाईल सोसायटीमध्ये चालत होते ड्रग्सचे रॅकेट मानपाडा पोलिसांची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : कल्याण परिमंडळ तीन मध्ये पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात मोठी कारवाई करत मोठ्या प्रमाणावर एमडी ड्रग्स जप्त केले आहे. डोंबिवलीच्या खोणी पलावा येथील डाउनटाऊन मधील एका हायप्रोफाईल सोसायटी मध्ये छापा टाकून पोलिसांनी दोन कोटी बारा लाख रुपयांचा एक किलो 93 ग्राम एम डी ड्रग्स जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली असून यामध्ये दोन पुरुष तर एका महिलेचा समावेश असून त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

मानपाडा पोलीस ठाणे डोंबिवली यांनी गोपनीय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीनुसार गुरुवारी रात्री डाउन टाउन, खोणी पलावा याठिकाणी छापा टाकुन याठिकाणी मिळुन आलेल्या आरोपी कडुन एकुण १.९३ किलो मेफेड्रॉन (एमडी) एकुण कि.अं २.१२ करोड रकमेपेक्षा अधिक किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करून त्यास अटक करून त्याच्या सोबत राहणाऱ्या परंतु पसार झालेल्या दोन साथिदारांना रातोरात ताब्यात घेवुन अटक केलेली आहे. तसेच इतर आरोपीतांचा शोध घेण्यात येत आहे. अटक आरोपी हे साठा केलेला अंमली पदार्थ हा अटक केलेल्या महिला आरोपीच्या मदतीने विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राम चोपडे, सपोनि कलगोंडा पाटील, संपत फडोळ, पोशि बडे, दिघे यांच्या पथकाने केली आहे.

# मुरबाड नगरपंचायत कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर

## कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात रु. ७९,९७,७३२/- जमा !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड** : गेले अनेक वर्ष भविष्य निर्वाह निधीपासुन वंचित राहिलेल्या मुरबाड नगरपंचायत मधील कर्मचाऱ्यांच्या खात्यात भविष्य निर्वाह निधीचा भरणा केल्याबद्दल मुख्याधिकारी मनोज म्हसे , नगराध्यक्ष संतोष चौधरी व नगरपंचायत प्रशासन यांचे आभार मानले आहेत.

मुरबाड नगर पंचायतची स्थापना सन २०१५ साली करण्यात आली. ग्रामपंचायत काळापासून एकूण ९५ कर्मचारी होते. त्यामधील काही कर्मचारी यांची इतर नगरपरिषद मध्ये बदलीने समावेशन झाले आहे. काही कर्मचार्यांचे मुरबाड नगरपंचायत मध्ये समावेशन झाले आहे. तर काही कर्मचार्यांचे शासन स्तरावर समावेशन प्रलंबित आहे. ग्रामपंचायत पासून या कर्मचाऱ्यांचा खात्यात भविष्य निर्वाह निधी जमा होणे बाकी होते. मार्च २०२५ मध्ये ग्रामपंचायत पर्यंतची रक्कम व ज्या कर्मचाऱ्यांची बदली झाले अशांच्या रकमा त्यांच्या खात्यात टाकण्यात आल्या होत्या. मात्र नगर पंचायत स्थापनेपासून (सन २०१५) च्या रकमा भरणा करणे प्रलंबित होते. तरी या सर्व कर्मचाऱ्यांची रक्कम रु. ७९,९७,७३२/- (अक्षरी- एकोणऐंशी लक्ष सत्याण्णव हजार सातशे बत्तीस मात्र) त्यांचा भविष्य निर्वाह निधी खात्यात जून २०२५ रोजी जमा झाल्याने कर्मचार्यांनी मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले. तसेच यापुढे सदरच्या रक्कम वेळोवेळी त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल याचे आश्वासन मुख्याधिकारी यांनी दिले.

# भिवंडीत श्रमजीवींचे रास्ता रोको..

## रात्री बारा लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित..

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी वाडा मनोर व खारबाव कामण चिंचोटी रस्त्याच्या दुरवस्थेकडे राज्य शासनासह लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने प्रवासी नागरिक त्रस्त झाले आहेत. हा रस्ता बनविणाऱ्या ठेकेदारावर कोणत्याही प्रकारची फौजदारी कारवाई झाली नाही. खराब रस्त्यामुळे अपघात व वाहतूक कोंडी सारखा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे तरीसुद्धा शासन लक्ष देत नसल्याने प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी व गलथान कारभाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी श्रमजीवी संघटनेने गुरुवारी पुकारलेल्या अभूतपूर्व रास्तारोको आंदोलन मध्यरात्री १२ वाजता जिल्हा प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना निवेदन सादर आले.

भिवंडी वाडा व अंजूरफाटा खारबाव कामण चिंचोटी या रस्त्यांच्या दयनीय अवस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेने गुरुवारी सकाळी ११ वाजता भिवंडी तालुक्यातील कवाड नाका,नांदीठणे,अंबाडी नाका,मालोडी वसई तालुक्यात चिंचोटी, कामण तर वाडा तालुक्यातब कुडूस,डाकिवली फाटा, शिरीष पाडा,खंडेश्वरी नाका अशा नऊ ठिकाणी एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन पुकारले होते.या सर्व ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनात शेकडो महिला व नागरिक, शाळकरी विद्यार्थी सहभागी झाले होते.जोपर्यंत आंदोलनातील प्रमुख मागण्या मान्य होत नाहीत तो पर्यंत आंदोलन सुरू राहणार असा पवित्रा घेत आंदोलनस्थळी जेवणासाठी चुली मांडल्या होत्या.त्यामुळे या दोन्ही मार्गावरील वाहतूक कोंडी झाली होती.

त्यामुळे पोलिसांनी दखल घेत अनेक ठिकाणी वाहतूक पर्यायी मार्गाने वळवून प्रवासी नागरिकांना दिलासा दिला.सायंकाळी श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी दत्तात्रय कोलेकर, बाळाराम भोईर, विजय जाधव,अशोक सापटे व अन्य पदाधिकारी यांना अंबाडी येथे चर्चेसाठी पाचारण करण्यात आले. ठाणे व पालघर जिल्ह्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे,कार्यकारी अभियंता सचिन पाटील,वाडा उपविभागीय अधिकारी संदीप चव्हाण,उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे पाटील,जव्हार उपविभागीय अधिकारी गणपत पिंगळे,भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले, वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे आणि ठाणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्यासह महत्त्वाचे अधिकाऱ्यांनी चर्चा केली यावेळी अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांनी या आंदोलनाची दखल बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री कार्यालयाने घेतली असून, ठाणे जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची जबाबदारी सोपवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच. नादुरुस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी तातडीने सुरू होईल,तसेच ठेकेदारावर काळ्या यादीत टाकण्याचे आश्वासनाची अंमलबजावणी करण्याचे लेखी आश्वासन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.त्यानंतर मधरात्री हे आंदोलन स्थगित करण्यात आले.




**मेष**

तुमच्याकडे खूप काम असले तरीही तुम्ही तुमच्या कुटुंबाला प्राधान्य द्याल.मुलांची कोणतीही समस्या सोडवण्यासाठी तुमचे योगदान आवश्यक आहे,.

**वृषभ**

त्यामुळे मुलांशी बोला आणि त्यांना चांगल्या गोष्टी समजावून सांगा. भागीदारी व्यवसायात, एकमेकांशी समन्वय साधणे महत्वाचे आहे.

**मिथुन**

मित्रांसोबत बाहेर जावे लागेल.अनवधानाने घरातील वडीलधाऱ्यांचा मान-सन्मान दुखावला जाणार नाही याची काळजी घ्या. रागावर नियंत्रण ठेवा.

**कर्क**

कोणतीही नवीन व्यवसाय योजना करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. इतरांच्या कामात ढवळाढवळ करू नका किंवा योजना करू नका.

**सिंह**

पालकांचे सहकार्य मिळेल आणि त्यांचा सल्लाही घ्याल. आज, आर्थिक स्थिती स्थिर राहणार आहे.जुन्या नकारात्मक गोष्टींना वर्तमानावर वर्चस्व देऊ नका.

**कन्या**

जवळच्या व्यक्तीशी संबंध बिघडू शकतात. तुमच्या जवळच्या व्यक्तीच्या वैवाहिक जीवनातील समस्यांमुळे तुम्ही चिंतेत असाल.

**तूळ**

इतरांच्या जीवनात ढवळाढवळ करण्यापेक्षा आपले जीवन चांगले बनवण्याचा प्रयत्न करावा.आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**वृश्चिक**

तुम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीत अती शिस्तबद्ध आणि कठोर असण्यामुळे इतरांना त्रास होऊ शकतो. तसेच कर्मचाऱ्यांच्या सल्ल्याला महत्त्व द्या.

**धनु**

पती-पत्नीच्या नात्यात गोडवा येईल.आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. तुमच्या आरोग्यासोबतच कुटुंबाच्या आरोग्याकडेही लक्ष द्या.

**मकर**

तुमचे एखादे काम प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असेल तर ते आज पूर्ण होईल.मुलांबाबत तुम्हाला जी काही चिंता असेल ती दूर होईल.

**कुंभ**

तुम्ही एखाद्या धार्मिक किंवा अध्यात्मिक ठिकाणी वेळ घालवू शकता. वाद टाळा.कोणताही जुना आजार आज पुन्हा उद्भवू शकतो.

**मीन**

आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी कल्पकतेने विचार करा आणि यश मिळवा.तुम्ही आत्मपरीक्षण कराल आणि तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्याचा विचार करा.






# मीरा भाईंदर मनपात २ हजार ७०० कोटींची विकासगंगा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :**माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिलेली २ हजार ७०० कोटी रुपयांची विकास कामे प्रगतीपथावर असून त्यातील अर्ध्या कामांचे लोकार्पण येत्या चार महिन्यात होईल असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विकास कामाचा आढावा घेण्यासाठी महापालिका मुख्यालयात बोलवलेल्या बैठकीत व्यक्त केला. बैठकीला मीरा भाईंदर महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा,



एमएमआरडीसीचे अतिरिक्त आयुक्त, सूर्या प्रकल्पाचे अधिक्षक अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

सरनाईक पुढे म्हणाले की, महायुतीच्या कालखंडात एकनाथ शिंदे यांनी मीरा भाईंदर महापालिका क्षेत्रासाठी सर्वाधिक निधी दिल्याचे राज्यातील एकमेव उदाहरण असेल, मंजूर निधीतील अर्ध्या कामांचे लोकार्पण येत्या चार महिन्यात होईल तर उर्वरित कामे वेळेत पूर्ण करण्याचा मानस आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महापालिका आयुक्तांना निर्देश दिले त्यात महापालिका भूखंड अतिक्रमणमुक्त करणे, स्तनदा माता, लहान मुले यांना सोयी सुविधा देण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या प्रत्येक उद्यानात एक हिरकणी कक्ष उभारण्यात यावा, पाळीव प्राण्यांची स्मशानभूमीची निर्मिती करणे यांचा समावेश आहे. तसेच या बैठकीत सुर्या पाणीपुरवठा योजना, जुन्या धोकादायक इमारतींचा प्रश्न, दिव्यांगांचे प्रश्न, अग्निशामक दलाची भरती प्रक्रिया या प्रकल्पांचा आढावा मंत्री सरनाईक यांनी घेतला.

# नोंदणी व मुद्रांक विभागात २८४ पदांकरिता भरती

## १ ते ८ जुलै दरम्यान ऑनलाईन परीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.27 :** नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात 284 पदे भरतीकरिता दि.22 एप्रिल 2025 रोजीच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ही भरती प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याकरिता तसेच ऑनलाईन पध्दतीने परीक्षेचे आयोजन करण्याकरिता आय.बी.पी.एस. (इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) कंपनीस नियुक्त केले आहे, त्यानुसार आय.बी.पी.एस. कडून दि.22 एप्रिल ते दि.16 मे 2025 दरम्यान ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात आले आहेत.

त्यानुसार आय.बी.पी.एस.च्या संकेतस्थळावर यशस्वीरीत्या भरलेले अर्ज व पात्र असलेल्या उमेदवारांची दि.01 जुलै 2025 ते दि.08 जुलै 2025 या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास त्यांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आय.बी.पी.एस. कडून पाठविण्यात येणार आहे.

या परीक्षेकरिता विभागाकडून कोणतीही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. जर याबाबत कोणती व्यक्ती, संस्थेकडून, मध्यस्थ अथवा तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी कृपया सावध राहावे, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे करण्यात आले आहे.

# भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या इमारतींवर नवी मुंबई पालिकेची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई शहरात इमारतीचा वापर करण्यासाठी पालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र घेणे अत्यावश्यक असून त्याशिवाय २१११ इमारतींचा वापर सुरू असल्याने पालिकेने भोगवटा प्रमाणपत्र घ्या अन्यथा कारवाईचा इशारा दिला आहे. उच्च न्यायालयात याबाबत एक जनहित याचिका असून न्यायालयाच्या आदेशानुसार भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.



## कल्याण, डोंबिवली महापालिका हद्दीत

# मंगळवारी पाणी पुरवठा बंद !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा मंगळवार, १ जुलै रोजी सकाळी नऊ ते संध्याकाळी चार दरम्यान बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत महावितरणकडून विद्युत पुरवठा केल्या जाणाऱ्या टाटा पॉवर कांबा उपकेंद्रातील एनआरसी २ फिडरच्या देखभाल

दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. या विद्युत उपकेंद्रातून कल्याण, डोंबिवली शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या नेतिवली, मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्रांना वीज पुरवठा केला जातो. हे दुरुस्तीचे काम सात तास केले जाणार आहे. त्यामुळे नेतिवली, मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा होणाऱ्या कल्याण ग्रामीण भागातील मांडा, टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी, मोहने आणि परिसरातील गावे, कल्याण पश्चिमेतील ब प्रभाग हद्दीतील मिलिंदनगर, योगीधाम, चिकनघर, बिर्ला महाविद्यालय परिसर, म्हाडा वसाहत, मुरबाड रस्ता परिसर, डोंबिवली पूर्व आणि पश्चिमेचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

## अति पर्जन्यवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर संकट

# भाताचे बियाणे कुजल्याने उरणमधील शेतकरी धास्तावले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** पावसाच्या लहरीपणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. अति मुसळधार पावसामुळे पेरण्या वाया जाण्याची भीती आहे. तर शेती ओसाड ठेवण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर ओढवली आहे. शेतकऱ्यांचे भात राबातील बियाणेच कुजून गेल्यामुळे शेतकरी पुरता धास्तावला आहे. धूळपेरणीला पावसामुळे संधीच मिळाली नसल्याने शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी होत आहे.

या वर्षी पावसाला मे महिन्यातच सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांचे शेतीचे वेळापत्रक कोलमडले आहे. त्यात पावसाचा लहरीपणा वाढल्याने महागडी बियाणे वापरून केलेली पेरणी वाया जाण्याची भीती आहे. उरणमध्ये अनेक ठिकाणी जूनच्या ५-६ तारखेपासून पेरणीला सुरुवात केली. मात्र पावसाचा वेग वाढतच राहिला. त्यामुळे भातरोपे तयार न होताच बियाणे कुजून गेले. तरीही शेतकऱ्यांनी पुन्हा एकवार दुबार भातपेरणीची तयारी केली आहे. मात्र पाऊस थांबण्याचे नाव घेत नसल्यामुळे उरल्यासुरल्या भात बियाण्यांचा वापर करण्यात आला आहे. मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने या भात बियाणाला उगवण्याची संधीच दिली नाही. त्यामुळे तालुक्याबरोबर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर शेती ओसाड ठेवण्याची वेळ आली आहे. महागडी बियाणे खरेदी करून अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी दुबार पेरणी केली, मात्र भाताची उगवण व्यवस्थित न झाल्याने बळीराजा धास्तावला आहे. या वर्षी सततच्या पावसामुळे जमिनीत ओलावा राहिल्याने रोपांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला असून काही ठिकाणी उगवलेली रोपे फार कमकुवत असल्याचे कृषिमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील व शेतकरी रमेश फोफेरकर यांनी सांगितले.

# भिवंडीतील काल्हेर गावात उबर चालकावर ब्लेडने हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे -** जेवणासाठी पैसे दिले नाही म्हणून एका अनोळखी व्यक्तीने उबर चालकावर ब्लेडने हल्ला केल्याची घटना भिवंडीतील काल्हेर भागात उघडकीस आली आहे. याप्रकरणी उबर चालकाने नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून पोलिसांनी या तक्रारीच्या आधारे त्या आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.

तोफीक रियाज खान (२३) असे उबर चालकाचे नाव आहे. तोफीक हे २५ जून रोजी दिवा येथून प्रवासी घेऊन काल्हेर रेती बंदर रोड येथे आले होते. प्रवासी सोडल्यानंतर ते त्या परिसरातील पाईप लाईनजवळील लॉन्ड्रीसमोर थांबले होते. त्यावेळी एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्याकडे जेवणासाठी ५०० रुपयाची मागणी करु लागला. तोफिक यांनी त्या व्यक्तीला माझ्याकडे पैसे नाही असे सांगितले. त्यावेळी त्या व्यक्तीने रागात तोफिक यांना शिवीगाळ करत ब्लेडने त्यांच्या डाव्या गालावर आणि मानेच्या उजव्या बाजूला वार केला.

या हल्ल्यात तोफीक यांच्या गालावर गंभीर जखम झाली. या हल्ल्यानंतर आरोपीने तेथून पळ काढला. जखमी अवस्थेत तोफीक यांनी नारपोली पोलीस ठाण्यात जाऊन आरोपी विरोधात तक्रार दिली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्या आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# बदलापूरातील सिग्नलला होर्डिंगचा विळखा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. 27**

बदलापूर शहरात वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी चौक परिसर आणि मुख्य रस्त्यांवर पालिकेने सिग्नल यंत्रणा बसवण्यास सुरुवात केली आहे. अंबरनाथ-बदलापूर मुख्य रस्त्यावरील शिरगाव परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक प्रवेशद्वाराबाहेरही सिग्नल यंत्रणा बसवली आहे. हे सिग्नल पालिकेच्या होर्डिंगच्या कमानी मागे लपले जात आहे. बदलापूर पालिकेने शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय शोधून काढला आहे. वाहनांची वर्दळ जास्त असलेल्या ठिकाणी, चौक परिसर आणि राज्य महामार्गाला जोडणारे मुख्य रस्ते येथे पालिकेच्या माध्यमातून सिग्नल यंत्रणा उभारण्यात आली आहे. मात्र, काही सिग्नल यंत्रणा ही नियोजनअभावी उभारण्यात आल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. यातील मुख्य उदाहरण म्हणजे, अंबरनाथ-बदलापूर मुख्य रस्त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक प्रवेशद्वार कात्रप ते शिरगाव परिसरातील मध्य भागात बसवण्यात आलेली सिग्नल यंत्रणा आहे. ही सिग्नल यंत्रणा पालिकेने बसवलेल्या होर्डिंगच्या आड लपली जात आहे. त्यामुळे वाहनचालकांनी सिग्ग्रल बघायचे कसे? हा प्रश्न वाहनचालक उपस्थित करत आहेत.

# मेट्रोसाठी कापल्या जाणाऱ्या झाडांचे फेरसर्वेक्षण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** मेट्रो कारशेडसाठी कापण्यात येणाऱ्या झाडांची एमएमआरडीएच्या कंत्राटदाराने चुकीची माहिती दिली असून यात झाडांचे वय व संख्या दिली नसल्याचा प्रकार समोर आला आहे. या संदर्भात पर्यावरण प्रेमींनी आवाज उठल्यानंतर झाडांचे फेर सर्वेक्षण करून घेण्याचा - निर्णय महापालिकेने घेतला आहे.

मेट्रो प्रकल्प क्रमांक ९ अंतर्गत, भाईंदरच्या डोंगरी भागात कारशेड उभारण्यात येणार आहे. या कामासाठी शासनाने परवानगी दिली असून महापालिकेने बांधकामासाठी परवानेही मंजूर केले आहेत. तथापि,



एमएमआरडीएने या कारशेडसाठी सुमारे १२,४०० झाडे तोडण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यासंदर्भात महापालिकेने १२ मार्च रोजी जनतेसाठी सूचना प्रसिद्ध केली होती, ज्यावर हजारो नागरिकांनी हरकती नोंदवल्या. या हरकतींची सुनावणी ११ एप्रिल रोजी पार पडली. झाडे तोडू नयेत, यासाठी २१,००० नागरिक आणि अनेक सामाजिक संस्थांनी स्वाक्षरी केलेले पत्र सादर करून तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यामुळे सध्या या प्रकरणी शासनाच्या अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे.

**तोडण्यात आलेल्या झाडांवर सर्वेक्षण क्रमांक नमूद नव्हते. तसेच प्रसिद्ध सूचनेतील माहिती आणि प्रत्यक्ष झाडांचे वय व उंची यात स्पष्ट तफावत होती. त्यामुळे झाडांचे पूर्वी झालेले सर्वेक्षण चुकीच्या पद्धतीने झाल्याचा आरोप करत, पर्यावरणप्रेमींनी आयुक्त राधा विनोद शर्मा यांच्याकडे फेरसर्वेक्षणाची मागणी केली आहे**

दरम्यान, आठवड्याभरापूर्वी झाडे तोडण्याच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली. मात्र, शासन निर्णय होण्यापूर्वीच झाडे तोडली जात असल्याने पर्यावरणप्रेमींनी संताप व्यक्त केला आणि प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. त्या वेळी असे आढळले की, तोडण्यात आलेल्या झाडांवर सर्वेक्षण क्रमांक नमूद नव्हते. तसेच प्रसिद्ध सूचनेतील माहिती आणि प्रत्यक्ष झाडांचे वय व उंची यात स्पष्ट तफावत होती. त्यामुळे झाडांचे पूर्वी झालेले सर्वेक्षण चुकीच्या पद्धतीने झाल्याचा आरोप करत, पर्यावरणप्रेमींनी आयुक्त राधा विनोद शर्मा यांच्याकडे फेरसर्वेक्षणाची मागणी केली. त्यानुसार, आयुक्तांनी उद्यान विभागाच्या उपायुक्त कल्पिता पिंपळे यांना झाडांचे फेरसर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे या झाडांचे फेर सर्वेक्षण केल्यानंतरच पुढील प्रक्रिया राबविली जाईल असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

# उल्हासनगर शहरात विजेचा खेळखंडोबा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. २६ :** उल्हासनगर परिसरात दहा चाळ, सुभाष टेकडी, महात्मा फुले कॉलनी, बुद्ध कॉलनी, भरत नगर, साईबाबा नगर, कुर्ला कॅम्प, नागसेन नगर या भागांतील नागरिक अक्षरशः वीजपुरवठ्याच्या खेळखंडोब्याने त्रस्त झाले आहेत. दिवसातून अनेक वेळा खंडित होणारी वीज, खांबांची धोकादायक अवस्था, तुटक्या व झाडांमध्ये अडकलेल्या तारा, कर्मचाऱ्यांची तक्रार न ऐकण्याची वृत्ती आणि उघड्या डीपीमुळे वाढलेला अपघाताचा धोका या सर्व त्रासांना कंटाळून नागरिकांनी आता थेट महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करत समाधानकारक उपायांची मागणी केली आहे.

समस्या आणि नागरिकांचा आवाज महावितरणच्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता कुंभारे यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी अ‍ॅड. प्रशांत चंदनशिव आणि शिवनेरी फाउंडेशनचे अरविंद खरात यांनी संयुक्त निवेदन सादर केले. यामध्ये ११ प्रमुख मुद्द्यांचा समावेश होता. महावितरणकडून देण्यात आलेले मोबाईल नंबर वारंवार संपर्क करूनही उचलले जात नाहीत. कॅम्प ४ परिसरासाठी स्वतंत्र महावितरण कार्यालय उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना गांधी रोडवरील कार्यालयात जावे लागते. दिवसातून अनेक वेळा वीज गेल्याने घरगुती तसेच व्यावसायिक कामकाजात अडथळा निर्माण होतो. ३०-४० वर्षांपूर्वी लावलेल्या जुन्या वाहिन्यांमुळे तुटण्याचा धोका सतत निर्माण होतो. काही ठिकाणी खांब इतके खराब झाले आहेत की, ते कोणत्याही क्षणी कोसळू शकतात. पाणी सोडल्यावर वीज गायब होणे ही नित्याची बाब बनली आहे. वीजवाहिन्यांवर झाडांच्या फांद्या असल्याने वारंवार शॉर्टसर्किट होतो. कर्मचाऱ्यांकडे खांबावर चढण्यासाठी शिडी किंवा मोठी गाडी नाही, त्यामुळे दुरुस्तीला विलंब होतो. वीज खंडित झाल्यावर मोबाईलवर कोणताही संदेश येत नाही. त्यामुळे नागरिक अनभिज्ञ राहतात. गुरुनानक शाळेजवळच्या उघड्या डीपी लहान मुलांसाठी जीवघेण्या ठरू शकतात. एक दिवस उशीर झाला, तरी ग्राहकांच्या घरी मीटर काढण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, अशा अनेक तक्रारी त्यांनी मांडल्या.

# कल्याण बाजार समितीमध्ये खासदार बाळ्या मामांची प्रचार रॅली




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्रामध्ये महत्त्वाची समजली जाणारी कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती असून बाजार समितीची आता दयनिय अवस्था झाली आहे. रस्ते तसेच भाजीपाला ठेवण्यासाठी जागा नाही, शेतकरी व्यापाऱ्यांसाठी कोणत्याही सोयी-सुविधा नाहीत इत्यांदी अनेक समस्या असून त्या सोडविण्यासाठी महाविकास आघाडीचे व्यापारी मतदार संघातील उमेदवार मोहन नाईक व गिरीश पाटील यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्याचे आवाहन खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांनी केले आहे.

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक २९ जून रोजी होणार आहे. व्यापारी विकास आघाडीतून मोहन नाईक आणि गिरीष पाटील हे दोघेही महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचाराची रॅली संपूर्ण व्यापारी परिसरात काढण्यात आली. यावेळी खासदार सुरेश म्हात्रे यांनी विविध व्यापाऱ्यांच्या समस्यां जाणून घेतल्या व त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यासमयी अनेक व्यापाऱ्यांनी मोहन नाईक यांच्यासारखे अनुभवी बाजार समितीत हवेत व त्यांना आम्ही निवडून देऊ असा विश्वास खासदारांशी बोलतांना व्यक्त केला.

या प्रचार रॅलीत अनेक मतदार व्यापारी मित्रांसह शिवसेनेचे उपनेते विजय साळवी, भिवंडी लोकसभेचे संपर्कप्रमुख साईनाथ तारे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ट नेते वंडार पाटील, शरफूद्दीन कर्ते, रुपेश भोईर, भागवत बैसाणे, प्रथमेश पुण्यार्थी, उदय गावडे, सुजाता धारगळकर, सुनिला लेकावळे, मिनल कांबळे, तेजश्री सकपाळ यांच्यासह व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खासदार सुरेश म्हात्रे यांनी सांगितले की, बाजार समिती अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. रस्त्यांसाठी खासदार निधीतून २ कोटी मंजूर करण्यात आले आहे. तसेच पुढील अनेक कामे आपण टप्पाटप्प्याने पूर्ण करणार आहोत असे अभिवचन खासदार सुरेश म्हात्रे यांनी विविध व्यापाऱ्यांशी चर्चा करतांना दिले. बाजार समितीत सतत पाच वेळा निवडून आलेले मोहन नाईक यांच्यासारखा जाणकार नेता हवा आहे अशी प्रतिक्रीया यासमयी अनेक व्यापाऱ्यांनी दिली.



# रिंग रोड प्रकल्पाला गती

## एमएमआरडीएच्या बैठकीत आरेखनात लक्षणीय बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील डोंबिवली, कल्याण आणि टिटवाळा शहरांना जोडण्यासाठी आणि प्रवास गतिमान व सहज व्हावा, यासाठी कल्याण रिंगरोड हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारला जात आहे. रिंग रोड प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्यासाठी भूसंपादन लवकरात लवकर होणे गरजेचे आहे; मात्र या प्रक्रियेला वेळ लागणार असल्यामुळे त्याच्या आरेखनात बदल करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतला आहे.

कल्याण रिंग रोड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम कल्याण लोकसभा मतदारसंघात सुरू आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी एमएमआरडीएची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी भूसंपादन प्रक्रियेतील अडथळे दूर करण्याच्या सूचना केल्या होत्या. शिळ रस्ता ते मोठागावपर्यंतच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक ठिकाणी भूसंपादन करावे लागणार होते. त्यामुळे या प्रक्रियेत वेळ जाण्याची शक्यता होती. त्यामुळे आरेखनात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील टप्प्यांतील अतिक्रमणे हटवून रस्त्याला गती देण्याचीही सूचना डॉ. शिंदे यांनी केली आहे.



## ठाणे जिल्हा परिषद कृषि विभागाचा अभिनव उपक्रम

### Blogspot द्वारे खत साठा व उपलब्धतेची माहिती ऑनलाईन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत कृषि विभागाने शेतकऱ्यांना रासायनिक खतांची माहिती घरबसल्या, सहज उपलब्ध व्हावी यासाठी Blogspot या लोकप्रिय आणि सुलभ माध्यमाचा वापर करून खते माहिती प्रणाली सुरू केली आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या एकूण १६२ रासायनिक खत विक्री केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांवरून खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या अनुदानित खतांची विक्री करण्यात येते. मात्र अनेकदा खतांची उपलब्धता कळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांना वेळ व संसाधनांचा अपव्यय होतो. याला पर्याय म्हणून कृषि विभागाने तयार केलेला Blogspot (https://adothane.blogspot.com/p/box-sizing-border-box-margin-0-padding_72.html) हा पर्याय शेतकऱ्यांसाठी एक प्रगत व पारदर्शक डिजिटल साधन ठरत आहे. या Blog च्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या तालुक्यातील कृषि सेवा केंद्रांमध्ये उपलब्ध असलेल्या रासायनिक खतांचा साठा, खतांचे प्रकार, केंद्र चालकांचा मोबाईल क्रमांक, यासारखी माहिती सहज मिळते. जिल्हानिहाय, तालुकानिहाय आणि केंद्रनिहाय माहिती ही या प्लॅटफॉर्मवर दैनंदिन अद्ययावत करण्यात येते. परिणामी शेतकरी खत खरेदीचे अचूक नियोजन करू शकतात आणि गरजेनुसार योग्य केंद्राची निवड करू शकतात. Blogspot वापरणे अत्यंत सुलभ आहे. हे कोणत्याही स्मार्टफोनवर मोफत आणि कोणतीही अॅप डाऊनलोड न करता चालते. सदर माहिती संपूर्णपणे पारदर्शक व सार्वजनिक वापरासाठी खुली आहे, त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला योग्य वेळेत योग्य माहिती मिळू शकते.

या उपक्रमाबाबत कृषि विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर यांनी सांगितले की,"डिजिटल यंत्रणांचा प्रभावी वापर करून आम्ही शेतकऱ्यांना वेळेत आणि अचूक माहिती देण्याचा प्रयत्न करतो आहोत. या उपक्रमामुळे खत खरेदी सुलभ होणार असून, शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचतील. भविष्यात अधिकाधिक सुविधा या Blogspot च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे."

## विद्यार्थी व पोलीस यांची अमली पदार्थ विरुद्ध रॅली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण पोलीस ठाणे हद्दीत 26 जून या अमली पदार्थ विरोधी दिनाचे' औचित्य साधून पोलिस अधिकारी व पोलीस अंमलदार व विद्यार्थी यांचे सोबत जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाची शपथ घेण्यात आली. तसेच पुढे पेण पोलीस ठाणे येथून रॅली काढण्यात आली.

सदर रॅली पेण पोलीस ठाणे येथून सुरू होवून भगवानदास चौक कवढाळ तळे ,रा.का.पाटील चौक , राजू पोटे मार्ग नगरपालीक नाका , डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक , छत्रपती शिवाजी महाराज चौक , पेण पोलीस ठाणे अशी रॅली काढण्यात आली.सदर रॅली मध्ये सार्वजनिक कॉलेज ,प्रायव्हेट हायस्कुल, कन्या शाळा, भाऊ साहेब नेने विद्यालय असे एकूण 103 विद्यार्थी तसेच पेण पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप बागुल सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश राजपुत , विक्रम नवरखेडे , संतोष चव्हाण , मपोसई शिल्पा वेगुर्लेकर तसेच पोलिस ठाण्याचे 5 अधिकारी व 15 अंमलदार, शिक्षक, शांतता कमीटी सदस्य, पत्रकार संघ उपस्थित होते.

## महामार्गावरील वाहतूक कोंडी

### आ. तरेंनी घेतला जलवाहतुकीचा आढावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. 48 वर दररोज होणाऱ्या तीव्र वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल होत असून, या समस्येवर दीर्घकालीन आणि पर्यायी उपाय शोधण्याच्या दृष्टीने आमदार विलास तरे यांनी विरार - सफाळे परिसरातील जलवाहतुकीचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला.

या पाहणी दौऱ्यात त्यांनी कोळीवाडा, समुद्रकिनारा, आणि संभाव्य जेटी उभारणीची जागा यांचा आढावा घेतला. यावेळी संबंधित कोळी समाजाचे प्रतिनिधी, आणि स्थानिक नागरिकही उपस्थित होते. यावेळी आमदार तरे म्हणाले की, "मुंबई - अहमदाबाद महामार्गावर मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक आणि वाहनांची वर्दळ होत असून, वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर समुद्रमार्गे जलवाहतूक हा एक प्रभावी पर्याय ठरू शकतो. विरार - सफाळे दरम्यान जलमार्गाने प्रवासी आणि मालवाहतूक सुरु केल्यास महामार्गावरील ताण कमी होऊ शकतो, तसेच वेळ आणि इंधन वाचविले जाऊ शकतो." या संदर्भात तांत्रिक अहवाल तयार करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, बंदर विभाग व इतर तज्ज्ञ संस्थांच्या सहकार्याने पुढील पावले उचलण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जलवाहतूक प्रकल्पासाठी अपेक्षित लाभ म्हणून महामार्गावरील वाहतूक कोंडीत लक्षणीय घट, वेळ व इंधनाची बचत, पर्यटनास चालना, कोळी समाजाला रोजगाराच्या नव्या संधी, पर्यावरणपूरक वाहतूक सुविधा उपलब्ध होऊ शकते. शेवटी आमदार तरे म्हणाले की, "आपण फक्त समस्येकडे बोट न दाखवता पर्याय शोधून तो अंमलात आणणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य आहे. जलवाहतूक ही भविष्यातील गरज असून ती शक्य तितक्या लवकर प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू." यावेळी आमदार विलास तरे, मारंबल पाड्यातील व जलसार गावातील स्थानिक ग्रामस्थ, फेरी बोट जे व्यवस्थापक राज सोनवणे आदी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## राष्ट्रीय विद्युत सुरक्षा सप्ताह निमित्त

# महापालिकेच्या विद्युत विभागाकडून चर्चासत्राचे आयोजन



### इलेक्ट्रिक वस्तूंचा वापर पूर्वीपेक्षा अधिक

#### कर्मचाऱ्यांसह नागरिकांनीही तितकीच दक्षता घेण्याची गरज व्यक्त !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


**ठाणे** : सध्याच्या काळामध्ये सर्वच ठिकाणी इलेक्ट्रिक वस्तूंचा वापर अतिशय मोठ्या प्रमाणावर होत असल्याने विद्युत कर्मचाऱ्यांसोबत नागरिकांनीही अधिक दक्षता घेण्याची गरज आजच्या चर्चासत्रामध्ये व्यक्त करण्यात आली ,राष्ट्रीय विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त महापालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांच्यामार्फत आचार्य अत्रे रंगमंदिरातील कॉन्फरन्स हॉलमध्ये चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात ठाणे, भिवंडी, उल्हासनगर या महानगरपालिकांचे कार्यकारी अभियंता, विद्युत कर्मचारी, विद्युत कंत्राटदार यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

भलेही आज सुरक्षेची अनेक उपकरणे आणि माध्यमे उपलब्ध झाली असली तरी विजेशी संबंधित कोणतेही काम करताना विद्युत कर्मचाऱ्यांनी खबरदारी आणि काळजी घेणे आवश्यकच आहे. कारण लहान लहान गोष्टींमधूनच मोठमोठ्या घटना आणि अपघात घडत असल्याचे या चर्चासत्रात सांगण्यात आले.

आताच्या काळामध्ये घराच्या इंटिरिअरकडे जितके लक्ष दिले जाते तितकेच घरातील वायरिंगकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचा महत्त्वाचा मुद्दा यावेळी अधोरेखित करण्यात आला. तर विद्युत वाहिनीचे काम करताना कितीही जुने आणि जाणते कर्मचारी अधिकारी असलात तरीही शॉक हा तुम्हाला सांगून लागत नाही. त्यामुळे काम करताना आपण सतत खबरदारी आणि दक्षता बाळगणे ही अत्यावश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यासोबतच वीज मीटर फेजिंग आणि मुख्य वायरिंग, घरापासून मीटरपर्यंत येणारी वायर, काम करताना घ्यायची काळजी, पॅनलवर काम करताना घ्यायची काळजी, कोणती उपकरणे वापरावी, शॉर्ट सर्किटमुळे लागणारी आग, इमारतीमधील फायर फायटर यंत्रणेचे पॅनल, त्याची तपासणी, आरसीसीबी उपकरणाची गरज, एफआरएलएसएच केबलचे महत्त्व, आर्थिंग, अशा अनेक लहान मोठ्या मुद्द्यांवर महाराष्ट्र शासनाचे विद्युत निरीक्षक आर आर यादव, सहनिरीक्षक भूषण मानकामे, जाधव यांच्यासह इतर तज्ञ व्यक्तींकडून सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबतच वीज वापर आणि सुरक्षिततेबाबत भारत सरकारने नव्याने लागू केलेला सेंट्रल इलेक्ट्रिकल ॲक्ट आणि त्यातील महत्त्वपूर्ण तरतुदींची माहितीही यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

या चर्चासत्राला प्रमुख पाहुणे म्हणून महापालिकेचे लेखापरीक्षक लक्ष्मण पाटील, शिक्षण विभागाचे उपआयुक्त संजय जाधव राष्ट्रीय उत्पादकता परिषदेचे माजी संचालक टी. शंकर नारायण, महाराष्ट्राचे विद्युत निरीक्षक आर आर यादव, सहनिरीक्षक भूषण मानकामे यांच्यासह यशवंत पाटील, कार्यकारी अभियंता राजू राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.


प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



तो ईश्वर आपल्या अंत:करणात वास करीत आहे. त्याच्या ठायी सारा अहंकार उत्सर्जित करावा. आपली वाणी, आपले चित्त, आपल्या अवघे शरीर म्हणजे त्याच्याद्वारे होणारे कर्म हे सारे काही भगवंताच्या चरणी वाहून टाकायचे, त्याला शरण जायचे. हे शरण कसे जायचे? तर गंगेचे पाणी सर्व समर्पित वृत्तीने महासागरात प्रवेश करते त्याप्रमाणे.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज


# जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये डोंबिवली पत्रकार संघ २०२५ -२६ चे पत्रकार परिषदेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : जाह्नवीज मल्टी फाऊंडेशन अंतर्गत जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा विद्यामंदिर च्या मधुबन वातानुकुलीत दालनामध्ये पत्रकार परिषद आयोजित केली होती.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे, संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे , पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.शंकर जाधव, तसेच इतर वृत्तपत्रांचे, वाहिनीचे प्रतिष्ठित पत्रकार उपस्थित होते. संस्थापकानी सर्व उपस्थित पत्रकारांचे शाल देऊन स्वागत केले व परिषदेला सुरुवात झाली. पत्रकार परिषदेचा विषय हाच होता की, प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम, सण वार, याची माहिती असणे गरजेचे आहे.आपला भारत देश हा सर्व धर्म समभाव असणारा देश आहे, त्यामधले राज्य म्हणजे महाराष्ट्र राज्य. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास असणारा आणि संस्कृतीनी भरून पावलेला अशी महाराष्ट्राची ख्याती आहे. असेच अनेक सण वार, कार्यक्रम, पारंपरिक पद्धतीने साजरे केले जाणारे सण या सर्व बाबतीत जन गण मन शाळा डोंबिवली मध्ये अग्रगण्य आहे.

जे एम एफ संस्थेमध्ये दर महिन्याला येणारे सण साजरे केले जातात, सर्व मुलांसहित शिक्षकांचा सहभाग उत्साहाने असतो, उपस्थित सर्वच पत्रकारांनी या गोष्टीला दुजोरा दिला व जे एम एफ संस्थेच्या वर्षभर होत असलेल्या उपक्रमाचे कौतुक देखील केले. साल 2025 हे जे एम एफ संस्थेचे रजत महोत्सव वर्ष म्हणून सुरू आहे. त्या निमित्ताने वर्षभर सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे.




अनेक पत्रकारांनी संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांना शाळेविषयी प्रश्न विचारले .डोंबिवली मध्ये देणगी विरहित ही एकमेव संस्था आहे त्या मागचा उद्देश काय असेही विचारण्यात आले, त्याचे उत्तर देताना संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी सांगितले की, आपल्या भारतामध्ये अनेक ऋषी मुनी होऊन गेले, गुरुकुल पद्धतीने अध्यापन करून त्यांनी शिष्य घडवले, निस्वार्थी आणि निरपेक्ष भावनेने अध्यापन केलेले शिष्य हे भविष्यात रथी महारथी घडले, कोणतीही अवाजवी शुल्क न घेता केवळ समाधानाची गुरुदक्षिणा घेतली जात असे, हेच धोरण ठेऊन कोणतीही देणगी न घेता जे एम एफ संस्था आजही कार्यरत आहे ,असे सांगितल्यावर उपस्थितांनी टाळ्यांचा गजर केला.

प्रति महाकुंभ मेळा, जी 20, राम लाला प्रतिष्ठापना, शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा, नवरात्री, गणपती प्रतिष्ठापणा, नाग पंचमी, बैलपोळा, भोंडला, दिवाळी त्याच बरोबर इतर सर्व धर्माचे सण वर्षभर साजरे केले जातात, सर्व शिक्षक वर्ग यासाठी खूप प्रयास करून माहिती देखील देतात, सध्याच्या परिस्थिती मध्ये मोबाईल हा जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे , परंतु त्याचा होणारा अवाजवी वापर आणि जीवनावर होणारा वाईट परिणाम विचारात घेता एक दिवस मोबाईल शिवाय....हा दिवस देखील सप्टेंबर महिन्यात साजरा केला जातो, काटेकरपणे मोबाईल घरातूनच आणायचा नाही हा प्रतिबंध असतो, असे संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना, निम्म्या दरात प्रवास योजना , मोफत शारीरिक तपासण्या मुलांसाठी जे एम एफ बँक , रोजगार हमी, अशा अनेक योजना जे एम एफ संस्थेमध्ये राबविल्या जातात असेही आपल्या वृत्तामध्ये नमूद केले.

पार पडलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सर्व पत्रकारांच्या प्रश्नांना समर्पक रित्या उत्तरे देऊन संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे आणि सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी सर्वांची मने जिंकली. आभार प्रदर्शन केल्यावर, शाळेच्या संगीत शिक्षिका सौ.श्रेया कुलकर्णी यांनी वंदे मातरम् म्हणून कार्यक्रमांची सांगता केली.

## समृद्धीच्या जिलेटीन ब्लास्टिंग व जड वाहतुकीमुळे

# जलशुध्दीकरण केंद्र व साठवणूक पाण्याच्या टाकीचे नुकसान

### योजना बांधकाम पूर्ववत करण्याची ग्रामपंचायत सदस्या मंदा डोंगरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद** : सरलांबे ग्रामपंचायत मधील सरलांबे, अर्जुनली व खुटाडी या गावांना पाणी पुरवठा होणाऱ्या पाणी योजनेचे येथील समृद्धी महामार्ग बांधकामच्या जिलेटीन ब्लास्टिंग व झालेल्या जड वाहतूक मुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गावातील शुद्ध पाणी पुरवठा बाबत अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे सदर योजनेचे बांधकाम पुर्ववत व्हावे व यासाठी संबंधित विभागाकडून पाहणी करून योजना पूर्ववत बांधकामसाठी आदेश देण्यात यावेत अशी मागणी ग्रामपंचायत सदस्या मंदा अशोक डोंगरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.





शहापूर तालुक्यातील सरलांबे, अर्जुनली व खुटाडी या गावांसाठी भातसा नदी पात्रातून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित होती. परंतु मागील सुरू असलेल्या मुंबई-नागपूर या समृध्दी महामार्गाच्या कामावेळी केलेल्या जिलेटीन ब्लास्टिंगमुळे जलशुध्दीकरण केंद्र व साठवणूक पाण्याची टाकी तसेच बुटाठी गावाजवळ गर्डर पडून घटलेल्या घटनावेळी या ठिकाणाहून अनेकदा जडवाहतूक झाल्यामुळे येथील पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी (पाइपलाइन ) नादुरुस्त होऊन असे संपूर्ण पाणी योजनेचे जवळपास 25 ते 30 कोटी पर्यंत नुकसान झाले असून यासंदर्भात संबंधित बांधकाम कंपनी व्यवस्थापन यांना लेखी व तोंडी विचारणा केली असता सदर बांधकाम पुर्ववत करून देतो अशी मोघम उत्तरे देण्यात आली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, या झालेल्या नुकसानीमुळे गावामध्ये पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच नदीवरील पाणी पंप लावून सरळ गावापर्यंत नेण्यात येत आहे त्यामुळे सध्या शुध्दीकरण न केलेले हे पाणी लोकवस्तीमध्ये पिण्यासाठी जात असल्याने ऐन पावसाळ्यात यामुळे आजार उद्भवण्याची भिती व्यक्त केली आहे. त्यामुळे या योजनेचे बांधकाम पुर्ववत व्हावे व यासाठी संबंधित विभागाकडून पाहणी करून योजना पूर्ववत बांधकामसाठी आदेश देण्यात यावेत अशी मागणी मंदा डोंगरे यांनी केली आहे.

# भिवंडीतील कालवार जिल्हा परिषद शाळेत निवडणूक

## मीत पाटील मुख्यमंत्रीपदी बहुमताने विजयी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : शैक्षणिक उपक्रमांसाठी व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सातत्याने चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील कालवार येथील जिल्हा परिषद शाळेत यंदाची शालेय मंत्रीमंडळ निवडणूक घेण्यात आली या वेळी मुख्यमंत्री म्हणून मीत शिरीष पाटील हा बहुमताने विजयी झाला.

लोकशाही मार्गाने पारंपरिक अशा मतपत्रिका (Ballot Paper) प्रणालीने पार पडली. मागील वर्षी EVM तंत्रज्ञानाचा प्रयोग करून निवडणूक घेणाऱ्या शाळेने यंदा विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण आग्रहास्तव बॅलेट पद्धतीचा अवलंब केला.

शाळा सुरु झाल्यानंतर प्रथम विद्यार्थ्यांना निवडणुकीसंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.



एकूण ७ पदांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली होती. २२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्यापैकी अभ्यास मंत्री पदासाठी एक उमेदवार बिनविरोध निवड झाल्याने उर्वरित ६ पदांसाठी २० उमेदवारांची चुरशीची लढत रंगली.निवडणुकीपूर्वी ४ दिवस प्रचारासाठी वेळ देण्यात आला. उमेदवारांना त्यांच्या निवडणूक निशाण्यांचे वाटपही करण्यात आले. पोस्टर, जाहीरनामे, घोषवाक्ये अशा माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या नेतृत्वगुणांची ओळख इतर विद्यार्थ्यांपुढे सादर केली.गुरुवार, २६ जून रोजी मोठ्या उत्साहात मतदान शाळा वर्गात पार पडले. मतदान प्रक्रियेसाठी इयत्ता सहावीचे विद्यार्थी गुलशन वागवे, रुही म्हात्रे आणि मित म्हात्रे यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले. या अनोख्या पद्धतीने झालेल्या निवडणुकीचे नियोजन वर्गशिक्षक अलंकार वारघडे यांनी केले.आज शुक्रवार नूतन मंत्रीमंडळाचा शपथविधी कार्यक्रम संपन्न झाला.

**मतदान केंद्र, बूथ सुविधा, मतपेटी यांचे नियोजन प्रशांत भोसले यांनी तर मुख्याध्यापिका अनिला काबाडी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकतेने व शांततेत पार पाडली.मतदान पूर्ण होताच उमेदवारांच्या उपस्थितीत मतमोजणी प्रक्रिया पार पडली.निकाल घोषित होताच शाळेत विजयी जल्लोष करण्यात आला. विद्यार्थ्यांनी टाळ्या आणि जल्लोषाच्या घोषणा देत विजयी उमेदवारांचे स्वागत केले.**

| शालेय मंत्रीमंडळ २०२५ - विजयी उमेदवारांची यादी |
| --- |
| मुख्यमंत्री - मीत शिरीष पाटील |
| आरोग्यमंत्री - वंशिका दीपक म्हात्रे |
| सफाई मंत्री - लावण्या शैलेश पाटील |
| अभ्यास मंत्री - खुशी सुधाकर भगत (बिनविरोध) व जीत प्रेमनाथ म्हात्रे |
| सांस्कृतिक मंत्री - तन्वी विठ्ठल म्हात्रे |
| प्रथमोपचार मंत्री - मानवी सुनील म्हात्रे |


जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024